**ठळक बातम्या**

- मुंबई- हावडा, दिल्ली- मुंबई, आणि मुंबई ते चेन्नईसह देशातल्या ७ महत्त्वाच्या रेल्वेमार्गांचं चौपदरीकरण करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय जीवनाला २५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त भाजपाचं येत्या १७ तारखेपासून सेवा संकल्प अभियान

- महाराष्ट्रात यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार

- जागतिक पॅरा तिरंदाजी मालिकेतल्या तिसऱ्या स्तराच्या स्पर्धेत भारताची २ सुवर्ण आणि ४ कांस्य पदकांची कमाई

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ८१३ अंकांची घसरण

**<><><><><>**

देशातल्या ७ महत्त्वाच्या रेल्वेमार्गांचं चौपदरीकरण करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून त्यात मुंबई- हावडा, दिल्ली- मुंबई, आणि मुंबई ते चेन्नई मार्गांचा समावेश आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर वार्ताहरांना ही माहिती दिली.

- **- - होल्ड - बाईट- अश्विनी वैष्णव - - -**

या मार्गांची एकूण लांबी ११ हजार किलोमीटर असून त्यावर मोठ्या प्रमाणात मालवाहतूक केली जाते. तमिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगण या राज्यांमधल्या १७ आकांक्षित जिल्ह्यांमधली सुमारे एकवीसशे खेडी मुख्य मार्गांना जोडली जातील. पर्यावरणस्नेही प्रकल्पामुळे कार्बन उत्सर्जनात दरवर्षी ४३ कोटी किलोग्रॅम एवढी लक्षणीय घट होईल, असं ते म्हणाले. या प्रकल्पांवर १० हजार २१ कोटी रुपये खर्च येणार असून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल, तसंच इंधनात बचत होईल असं वैष्णव यांनी सांगितलं.

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन पुढच्या वर्षी सुरु होईल असं त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. सुरवातीला सुरत ते वापी हा १०० किलोमीटरचा टप्पा कार्यान्वित होईल असं ते म्हणाले.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे, प्रवास जलद होईल, कनेक्टिव्हिटी मजबूत होईल आणि मालवाहतूक क्षमता वाढेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय जीवनाला २५ वर्ष पूर्ण होत असल्यानिमित्त भाजप येत्या १७ तारखेपासून महिनाभर सेवा संकल्प अभियान राबवणार आहे, अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी दिली. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**होल्ड - बाईट - नितीन नवीन**

'सेवा संकल्प अभियान'ची सुरुवात रक्तदान शिबिराच्या आयोजनानं होईल. येत्या ७ ऑक्टोबर रोजी मोदी यांच्या सार्वजनिक सेवेची २५ वर्षं पूर्ण होत आहेत. प्रधानमंत्र्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ७ ऑक्टोबर रोजी ग्रामीण आणि शहरी भागांना जोडणारी 'सेवा ज्योती कलश यात्रा' काढली जाईल, अशी माहिती नवीन यांनी दिली.

<><><><><>

यंदाचा ऊस गाळप हंगाम येत्या १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. सन २०२६-२७ साठी ऊस गाळप हंगामाचं धोरण निश्चित करण्याकरता मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या, मंत्री समितीच्या बैठकीत हा निर्णय झाला.

राज्यातली ऊस उपलब्धता, गाळपाचं नियोजन, साखर उत्पादन, शेतकऱ्यांना मिळणारा ऊसदर, तसंच साखर कारखान्यांपुढच्या विविध आर्थिक आणि तांत्रिक बाबींचा बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला.

<><><><><>

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज कोलंबो इथं श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांची भेट घेतली आणि दोन्ही देशांच्या कल्याण आणि विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. या भेटी दरम्यान श्रीलंकन हवाई

दलासाठी एल ७० तोफांचं आधुनिकीकरण आणि दोन्ही देशांच्या राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयांमधल्या सहकार्याबाबत सामंजस्य करार करण्यात आले.

<><><><><>

डिजिटल वित्तीय क्षेत्रातल्या नव्या तंत्रज्ञानाचा लाभ सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला उद्योजक आणि लघु उद्योगांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकार वचनबद्ध असून, एजेंटिक एआय आणि क्वांटम तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वित्तीय समावेशनाला नवी दिशा मिळणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज सांगितलं. ते मुंबईत वांद्रे कुर्ला संकुलातल्या जिओ कन्व्हेन्शन सेंटर इथं आयोजित 'ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६' मध्ये बोलत होते.

मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एमएमआरडीए आणि सेबी, राष्ट्रीय आणि मुंबई शेअर बाजार तसेच अंमलबजावणी संचालनालय यांच्यादरम्यान बीकेसीमध्ये विस्तार करण्याबाबतच्या करारांचं हस्तांतरण झालं.

<><><><><>

गुजरातमधे अहमदाबाद इथं आयोजित जागतिक पॅरा तिरंदाजी मालिकेतल्या तिसऱ्या स्तराच्या स्पर्धेत भारतानं २ सुवर्ण आणि ४ कांस्य पदकांसह ६ पदकं जिंकून ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आज स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी, जगातली अव्वल क्रमांकाची भारतीय तिरंदाज आणि विद्यमान जगज्जेती शीतल देवीनं महिलांच्या वैयक्तिक कंपाऊंड प्रकारात कझाकस्तानच्या ऐझादा सैदानचा पराभव करत सुवर्णपदक पटकावलं. पॅरालिम्पिक पदक विजेत्या हरविंदर सिंगने भावनाच्या साथीत रिकर्व्ह मिश्र सांघिक प्रकारात चीनच्या जोडीचा ६-० असा सरळ सेटमध्ये पराभव करत भारताला दुसरं सुवर्णपदक मिळवून दिलं. याआधी शीतल देवीनं तोमन कुमारसह मिश्र सांघिक प्रकारात कांस्यपदकही मिळवलं आहे. याशिवाय महिलांच्या वैयक्तिक रिकर्व्हमध्ये भावना, महिला वैयक्तिक कंपाऊंडमध्ये सरिता आणि पुरुषांच्या वैयक्तिक कंपाऊंडमध्ये तोमन कुमारने भारतासाठी कांस्यपदकांची कमाई केली.

<><><><><>

चीनमधे मोची इथं सुरू कनिष्ठ गट आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताच्या मुलांच्या संघानं चायनीज तैपेईचा १५-० असा धुव्वा उडवत दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे

या दणदणीत विजयामुळे भारतीय संघ एकूण १० गुणांसह 'पूल अ' मध्ये अव्वल स्थानी आला आहे.

दरम्यान, भारताच्या मुलींच्या संघानंही उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. उपांत्यपूर्व फेरीत उद्या त्यांचा सामना पाकिस्तानशी होणार आहे.

<><><><><>

अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुषांच्या एकेरीत अमेरिकेच्या बेन शेल्टन आणि फ्रान्सिस टियाफो यांनी उपांत्य फेरीत धडक मारली आहे.  हे दोन्ही खेळाडू पहिल्यांदाच ग्रँड स्लॅमची अंतिम फेरी गाठण्यासाठी एकमेकांसमोर उभे ठाकतील.

महिला एकेरीत, गतविजेती आणि अव्वल मानांकित आर्यना सबालेन्का आणि तिसरी मानांकित जेसिका पेगुला यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर १०० डॉलर्स प्रतिबॅरलपर्यंत पोहोचले. या दरवाढीचे परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवरही उमटले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ८१३ अंकांची घसरण झाली आणि तो ७४ हजार ७६४ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २०४ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ४३२ अंकावर बंद झाला.

<><><><><>

ब्रिक्स देशांच्या केंद्रीय अर्थमंत्र्यांची आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नरांची बैठक मुंबईत होत आहे. ब्रिक्स देशांच्या  संमेलनाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक होत असून, गेल्या महिन्यात जयपूर इथं अशी बैठक झाली होती. वित्तीय परिप्रेक्ष्यात चिकाटी, नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वतता उभारणे ही या संमेलनाची संकल्पना आहे.

<><><><><>

मनुस्मृतीचा निषेध आणि संविधानाच्या मूल्यांप्रती जनजागृती करण्याच्या उद्देशानं महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसनं आज नागपूरमध्ये ‘संविधान सन्मान यात्रा’ काढली. महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष शिवराज दादा मोरे आणि राज्य सह-प्रभारी नवज्योत सिंग संधू यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या यात्रेत युवक काँग्रेसचे पदाधिकारी, अधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.